**L. A. BILL No. VII OF 2024.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.

**सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७.**

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १ मार्च, २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९६१ चा महा. २४.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२४, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ यामध्ये नवीन कलम ६९अ समाविष्ट करणे.

१९६१ चा महा. २४.

**२.** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (यात यापुढे, ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ६९ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :–

सचिवांचा सहकारी जिल्हा संवर्ग घटित करणे व अशा संवर्गासाठी सेवायोजन निधी स्थापन करणे.

" **६९अ.** (१) प्राथमिक कृषी सहकारी पत संस्थांच्या सचिवांचा एक सहकारी जिल्हा संवर्ग (यात यापुढे या कलमात ज्याचा निर्देश, " सहकारी जिल्हा संवर्ग " असा केला आहे) घटित करण्यात येईल, त्यात, जिल्हा देखरेख सहकारी संस्थांनी या प्रयोजनासाठी भरती केलेल्या व्यक्तींचा समावेश असेल. सहकारी जिल्हा संवर्गात भरती करावयाच्या व्यक्तींची संख्या व त्यांच्या सेवेच्या शर्ती, राज्य शासनाकडून, याबाबतीत, वेळोवेळी काढण्यात येतील अशी सर्वसाधारण किंवा विशेष मार्गदर्शक तत्त्वे, कोणतीही असल्यास, यानुसार, जिल्हा देखरेख सहकारी संस्थेकडून निर्धारित करण्यात येतील.

(२) जिल्हा देखरेख सहकारी संस्थेस, तिने नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही संस्थेअंतर्गत काम करण्यासाठी, तिला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, वेळोवेळी, प्रतिनियुक्तीवर पाठविता येईल. जेव्हा अशा कोणत्याही व्यक्तीला, कोणत्याही संस्थेच्या अंतर्गत काम करण्यासाठी पदस्थापित केले जाते तेव्हा, जिल्हा देखरेख सहकारी संस्था निर्धारित करील अशा कालावधीसाठी व अशा अटींवर व शर्तींवर, त्या संस्थेकडून तिच्या सेवा, त्या पदावर घेण्यात येतील. अशा प्रकारे नियुक्त केलेली व्यक्ती, पोट-कलम (४) अन्वये स्थापन केलेल्या निधीमधून तिचे वेतन व भत्ते घेईल.

(३) सहकारी जिल्हा संवर्गात नियुक्त केलेल्या आणि पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक संस्थेच्या अंतर्गत सचिव म्हणून काम करण्यासाठी प्रतिनियुक्त केलेल्या किंवा पदस्थापित केलेल्या व्यक्तीवरील लगत प्रारंभिक पर्यवेक्षकीय नियंत्रण, संबंधित संस्थेकडे निहित असेल. अशी संस्था, सचिवाच्या सेवेच्या अटी व शर्तींच्या संबंधात जिल्हा देखरेख सहकारी संस्थेच्या उपविधींचे पालन करील.

(४) जिल्हा देखरेख सहकारी संस्था, " सहकारी जिल्हा संवर्ग सेवायोजन निधी " या नावाचा एक निधी स्थापन करील आणि या निधीचा, सहकारी जिल्हा संवर्गात नियुक्त केलेल्या व्यक्तींना प्रदान करावयाचे वेतन, भत्ते व इतर वित्तलब्धी यांवरील खर्च आणि संवर्गाशी संबंधित असलेला इतर खर्च भागविण्यासाठी वापर करण्यात येईल.

(५) सहकारी जिल्हा संवर्गातील कोणत्याही सचिवाच्या सेवेतून प्रत्यक्षपणे कोणताही लाभ घेत असलेली प्रत्येक संस्था, राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशा दराने व अशा रीतीने, उक्त निधीस अंशदान देईल. अंशदानाचा दर निर्धारित करताना, राज्य शासन, पोट-कलम (४) मध्ये निर्दिष्ट केलेला खर्च, देण्याचा संभव असतील अशा सेवा, संबंधित संस्थेने वितरित केलेली व अदत्त असलेली कर्जे आणि हाती घेतलेले इतर बिगर-पतपुरवठा उपक्रम यांसह, संस्थांची आर्थिक स्थिती विचारात घेईल.

(६) उक्त निधीची अभिरक्षा करण्याच्या व तिचे परिरक्षण करण्याच्या, तिच्यात पैसे भरण्याच्या आणि तिच्यातून खर्च करण्याच्या व तिच्यातून पैसे काढण्याच्या संबंधातील किंवा त्यास सहाय्यभूत असलेल्या सर्व बाबींचे नियमन करणारे नियम, राज्य शासनास करता येतील.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ८८ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८८ मध्ये, पोट-कलम (१) मधील, पहिल्या परंतुकातील, " दोन वर्षांच्या कालावधीच्या आत " या मजकुराऐवजी, " एक वर्षाच्या कालावधीच्या आत " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

राज्यातील सहकारी चळवळीचा सुव्यवस्थितपणे विकास करणे हे, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा महा. २४) याचे ध्येय आहे. ग्रामीण क्षेत्राचा आर्थिक विकास करण्यासाठी सहकार क्षेत्राचे सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने, प्राथमिक कृषी सहकारी पत संस्थांचे रुपांतर बहुउद्देशीय व्यवसाय संस्थांमध्ये करण्याचे केंद्र सरकारचे ध्येय आहे. उक्त प्राथमिक कृषी सहकारी पत संस्थांच्या सुरळीत कामकाजासाठी व त्यांवरील प्रभावी नियंत्रणासाठी, अशा संस्थांच्या सचिवांचा सहकारी जिल्हा संवर्ग स्थापन करणे आणि अशा संवर्गासाठी सेवायोजन निधी घटित करणे आवश्यक आहे, असे वाटते. उक्त प्रयोजनांसाठी, सचिवांचा सहकारी जिल्हा संवर्ग घटित करण्यासाठी आणि अशा संवर्गासाठी सहकारी जिल्हा संवर्ग सेवायोजन निधी स्थापन करण्यासाठी उक्त अधिनियमामध्ये नवीन कलम ६९अ समाविष्ट करण्याचे प्रस्तावित केले आहे.

२. प्राधिकृत व्यक्तीद्वारे, कलम ८८ च्या पोट-कलम (१) खालील, चौकशी व कार्यवाही पूर्ण करण्याचा कालावधी, दोन वर्षांवरून एक वर्ष इतका कमी करण्यासाठी, उक्त अधिनियमाच्या कलम ८८ मध्ये सुधारणा करण्याचे देखील प्रस्तावित केले आहे.

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४.

**दिलीप वळसे-पाटील,**
सहकार मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड २.**—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यामध्ये, नवीन कलम ६९अ समाविष्ट करण्याचा हेतू असलेल्या या खंडान्वये,—

(एक) पोट-कलम (५) मध्ये, सहकारी जिल्हा संवर्गातील सचिवाच्या सेवेतून संस्थेला प्रत्यक्षपणे जो लाभ प्राप्त होईल त्यासाठी संस्थेने प्रदान करावयाच्या अंशदानाचा दर व रीत विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे ;

(दोन) पोट-कलम (६) मध्ये, सहकारी जिल्हा संवर्ग सेवायोजन निधीची अभिरक्षा करण्याच्या व तिचे परिरक्षण करण्याच्या, तिच्यात पैसे भरण्याच्या आणि तिच्यातून खर्च करण्याच्या व पैसे काढण्याच्या संबंधातील सर्व बाबींचे नियमन करण्यासाठी नियम करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**२.** वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर नमूद केलेले प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचे आहेत.

## सन २०२४ चे वि.स.वि. क्र. ७.—महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२४ याचे परिशिष्ट

### (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यातील उतारे)

### (सन १९६१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २४)

**१.** ते **८७.** ** ** **

अपचारी प्रवर्तक वगैरेंविरुद्ध नुकसानी आकारण्याचा निबंधकाचा अधिकार.

**८८.** (१) एखाद्या संस्थेची कलम ८१ अन्वये लेखापरीक्षा किंवा कलम ८३ अन्वये चौकशी किंवा कलम ८४ अन्वये निरिक्षण चालू असताना किंवा त्या संस्थेचे समापन होत असताना किंवा अशा लेखापरीक्षेच्या, चौकशीच्या, निरिक्षणाच्या किंवा समापनाच्या परिणामी लेखापरीक्षकाने किंवा कलम ८३ अन्वये चौकशी करण्यास प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने किंवा कलम ८४ अन्वये पुस्तकांचे निरीक्षण करण्यास प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने किंवा कलम १०५ अन्वये परिसमापकाने दिलेल्या अहवालाच्या आधारे किंवा अन्यथा संस्थेच्या रचनेत किंवा व्यवस्थापनात जिने कोणताही भाग घेतला होता, अशा कोणत्याही व्यक्तीने किंवा संस्थेच्या कोणत्याही, मृत किंवा माजी किंवा विद्यमान अधिकाऱ्याने [१][अशा लेखापरीक्षेच्या किंवा चौकशीच्या, निरीक्षणाच्या किंवा चौकशीच्या, निरीक्षणाच्या किंवा समापनाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी] पाच वर्षाच्या कालावधीत संस्थेच्या कोणत्याही पैशाचे किंया मालमत्तेचे अपाययोजन केले आहे किंवा त्याने असा पैसा किंवा मालमत्ता ठेवून घेतली आहे किंवा त्याच्या संबंधात, तो उत्तरदायी किंवा जबाबदार झाला आहे किंवा संस्थेच्या बाबतीत कोणतेही अपकार्य किंवा विश्वासघात केल्याबद्दल तो दोषी झाला आहे, याबद्दल निबंधकाची खात्री होईल तर, निबंधकास किंवा त्याबाबत त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस अशा व्यक्तीविरुद्ध किंवा व्यक्तींविरुद्ध आरोप ठेवता येईल आणि संबंधित व्यक्तीस आणि मृत व्यक्तीच्या बाबतीत तिची मालमत्ता ज्याला वारसाने मिळाली. असेल अशा तिच्या प्रतिनिधीस आरोपाबाबत उत्तर देण्याची बाजवी संधी दिल्यानंतर निबंधक किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्ती या कलमानुसार ठरवतील त्या दराने जे व्याज होईल त्या व्याजासह, तो पैसा किंवा ती मालमत्ता किंवा त्या पैशाचा किंवा मालमत्तेचा कोणताही भाग, याची परतफेड करण्यास किंवा तो परत करण्यास किंवा असे अपायोजन केल्याबद्दल, ठेवून घेतल्याबद्दल, अपकार्याबद्दल किंवा विश्वासघात केल्याबद्दल भरपाई महणून निबंधक किंवा अशी व्यक्ती ठरवील, ती रक्कम संस्थेच्या मत्तेत भरण्याविषयी आदेश देता येईल.

"परंतु, या पोट-कलमाखालील कार्यवाही, निबंधकाने, आदेश काढल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीच्या आत प्राधिकृत व्यक्ती कडून पूर्ण करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, निबंधकास त्याबद्दलची कारणे नोंदवून उक्त कालावधी कमाल सहा महिन्यांच्या कालावधीकरिता वाढविता येईल.".

"परंतु असेही की, शासनाला, निबंधकाच्या अहवालावरून अथवा स्वतःहून लेखी कारणे नमूद करून, या पोट-कलमान्वये कार्यवाही पूर्ण करण्याकरिता वेळोवेळी आवश्यक असेल त्याप्रमाणे उक्त कालावधी वाढवून देता येईल :

परंतु असेही की, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम, २०१७ याच्या प्रारंभाच्या दिनांकास उपरोक्त कालावधीच्या आत या पोट-कलमान्वये जी कार्यवाही पूर्ण करण्यात आली नसेल त्या कार्यवाहीच्या बाबतीत, शासनाला निबंधकाच्या अहवालावरून अथवा स्वतःहून, लेखी कारणे नमूद करून आवश्यक असेल त्याप्रमाणे अशी कार्यवाही पूर्ण करण्याबाबतचा कालावधी वेळोवेळी वाढवून देता येईल.".

(२) व (३) ** ** **

**८८क.** ** ** **

**८९.** ते **१६८.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७.]**

**[महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. दिलीप वळसे-पाटील,**
सहकार मंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक १ मार्च, २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई